अहवाल लेखनः-

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित

कला आणि विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गडी तालुका गेवराई जिल्हा बीड.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग

आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळा

" स्पर्धा परीक्षेतील संधी"

दिनांक 2 व 3 जुलै 2021

गढी महाविद्यालयात 'स्पर्धा परीक्षेतील संधी' या दोन दिवसीय कार्यशाळेला भरघोस प्रतिसाद.

अभ्यास आणि प्रयत्नांच्या सातत्याने स्पर्धेचे दिव्य सहज पार करता येते. मान्यवरांचा संदेश.

=======================

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय गढी येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळा ' 'स्पर्धा परीक्षेतील संधी' ' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक २ व ३ जुलै २०२१ रोजी केलेले आहे. या कार्यशाळेस महाराष्ट्रातून भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. या कार्यक्रमांचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कदम, तर प्रमुख पाहूणे म्हणून लोहा, जिल्हा नांदेडचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष तांबे व शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. संदिप जोगदंड यांची उपस्थिती होती. तर या कार्यशाळेचे उद्घाटन माजी प्राचार्य डॉ. सुर्यकांत जगदाळे यांनी केले. उद्घाटक डॉ. जगादाळे सरांनीही UPSC, MPSC ची स्वरूप व पद्धती विषयी माहिती देऊन, कष्टाची तयारी हीच यशाची खरी सुरूवात असल्याचे त्यांनी सांगितले. व केंद्रीय व राज्य स्तरावर शासनाच्या विविध विभागात नोकरीच्या लाखों च्या संधी उपलब्ध असतात. असेही त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक श्री. संतोष तांबे यांनी स्पर्धा आणि परीक्षा हे एक दिव्य आहे. पण अभ्यास आणि प्रयत्नांच्या सातत्याने हे दिव्य सहज पार करता येते. असे सांगून उपलब्ध साधनांच्या मधूनच मार्ग काढावा लागतो. त्यासाठी निवड मात्र प्रामाणिकपणाने करावी लागेल. विविध पद, विविध दर्जा आणि अनेक संधी फक्त याच क्षेत्रात आहे, याचीही जाणीव ठेवणे गरजेचे आहे. मी कुठेही कमी नाही हा विश्वास मात्र भक्कम ठेवा. असेही पोलिस निरीक्षक संतोष तांबे यांनी सांगितले. तर प्रा. संदिप जोगदंड यांनी स्पर्धा परीक्षेचा मार्ग